1.मराठी भाषेचे 'पाणिनी' कोणाला म्हटले जाते?

अ) अरविंद मंगरूळकर

ब) दादोबा पांडुरंग

क) मो.के.दामले

ड) मा.ना.आचार्य

२. मो.के.दामले यांनी शब्दांचे वर्गीकरण कसे केले आहे?

अ) प्रतिपादके –धातू

ब) तत्सम-तद्भव

क) विकारी –अविकारी

ड) नाम –सर्वनाम

३.बुद्धी, मती, सृष्टी, पृथ्वी हे शब्द खालीलपैकी कोणत्या प्रकारचे आहेत ?

अ)तत्सम

ब)तद्भव

क) विकारी

ड)साधित

४. आख्यात प्रत्यय कशाचे निदर्शक असतात?

अ) वाक्याचा काळ, अर्थ

ब) वाक्याचा प्रकार , प्रयोग

क) वाक्याचा कर्ता, कर्म

ड) वाक्यातील शब्दांचे परस्परसंबंध

५. पहिला, दुसरा,तिसरा ही विशेषणे खालीलपैकी कोणत्या प्रकारची आहेत ?

अ) श्रेणीवाचक

ब) आवृत्तीवाचक

क) क्रमवाचक

ड)वारंवारीतावाचक

६. खालीलपैकी कोणता धातू अकर्तृक आहे?

अ) खाणे

ब) धावणे

क) गडगडणे

ड) बसणे

७. "अरेरे ! चक्रीवादळाने केवढे हे नुकसान झाले गावकऱ्यांचे !" या वाक्यातील 'अरेरे' हा शब्द कोणत्या प्रकारचा आहे ?

अ) शब्दयोगी अव्यय

ब) क्रियाविशेषण अव्यय

क) केवलप्रयोगी अव्यय

ड) उभयान्वयी अव्यय

८. विभक्तीप्रत्यय लागण्यापूर्वी शब्दाचे जे रूप तयार होते त्याला काय म्हणतात ?

अ) संयुक्त क्रियापद

ब) उभयान्वयी अव्यय

क) सामान्यरूप

ड) आख्यातरूप

९. मराठीतील लघुत्ववाचक ईकारान्त शब्द सामान्यतः कोणत्या लिंगाचे असतात ?

अ) नपुसकलिंगी

ब) पुलिंगी

क) स्त्रीलिंगी

ड) उभयलिंगी

१०. झोपाळू, विसराळू, लाजाळू या शब्दांतील प्रत्यय ओळखा.

अ) आळू

ब) ळू

क) अळू

ड) पाळू

११,"पार्वतीने नीळकंठास वरले" या वाक्यातील 'नीळकंठ' हा कोणत्या प्रकारचा सामासिक शब्द आहे ?

अ) अव्ययीभाव
ब) कर्मधारय
क) तत्पुरूष
ड) बहुव्रिही

१२. ज्या सामासिक शब्दाचा विग्रह करताना दोन्ही पदे एकाच - प्रथमा विभक्तीत येतात त्या सामासिक शब्दांना काय म्हणतात ?

अ)बहुव्रिही

ब) कर्मधारय समास

क) द्विगू समास

ड) मध्यमपदलोपी समास

१३. "मला डोंगर चढवतो" या वाक्यातील प्रयोग ओळखा .

अ)कर्मणी

ब)शक्य कर्मणी

क) समापन कर्मणी

ड) पुराण कर्मणी

१४. खालील वाक्यांतून अकर्मक कर्तरी प्रयोगाचे वाक्य ओळखा.

अ) ती गाणे गाते

ब) ती पुस्तक वाचते

क) ती वहीत लिहीते

ड) ती घरी जाते

१५.दात,हात,केस हे शब्द खालीलपैकी कोणत्या प्रकारचे आहेत?

अ)तद्भव

ब)तत्सम

क)विकारी

ड)अविकारी

१६.विशेषणे कोणत्या तत्वावर आधारलेली असतात?

अ) भेद

ब) भाव

क) अर्थ

ड)क्रिया

१७. तुम्हचिया, आम्हचिया अशा 'च्यान्त' विशेषणांपासून षष्ठीच्या प्रत्ययांची व्युत्पत्ती झाली आहे असे मत कोणी मांडले ?

अ) भांडारकर

ब) मॅक्सम्युलर

क) राजवाडे

ड) मंगरूळकर

१८. 'मी पुस्तक वाचते' या वाक्यातील 'पुस्तक' या शब्दाची कोणती विभक्ती मानली जाते?

अ)प्रथमा

ब) चतुर्थी

क) अप्रत्ययी द्वितीया

ड) षष्ठी

१९. खालीलपैकी कोणते विशेषण सार्वनामिक आहे ते ओळखा.

अ) दहा-बारा

ब) हुशार

क)माझा

ड) गोड

२०. "मला आज बस मिळाली नाही म्हणून कामावर यायला उशीर झाला"  या वाक्यातील 'म्हणून' हा शब्द कोणत्या प्रकारचा आहे ते ओळखा.

अ)क्रियाविशेषण अव्यय

ब) उभयान्वयी अव्यय

क) शब्दयोगी अव्यय

ड)केवलप्रयोगी अव्यय

२१. दोन किंवा अधिक शब्द एकत्र येऊन तयार होणाऱ्या जोडशब्दांना काय म्हणतात ?

अ) अभ्यस्त शब्द

ब) सामासिक शब्द

क) साधित शब्द

ड) तद्भव शब्द

२२. पंचवटी, चातुर्मास,नवरात्र ही कोणत्या  सामासिक शब्दांची उदाहरणे आहेत?

अ) तत्पुरूष

ब)द्वंद्व समास

क) कर्मधारय समास

ड) द्विगू समास

२३. खालील सामासिक शब्दांमधून इतरेतर द्वंद्व समास असलेला शब्द ओळखा.

अ)खरेखोटे

ब) स्त्रीपुरूष

क)बाजारहाट

ड)चार्तुर्मास

२४. कर्त्याच्या लिंगवचनाप्रमाणे वाक्यातील क्रियापदाचे रूप बदलते तेव्हा कोणता प्रयोग होतो?

अ)सकर्मक कर्तरी प्रयोग

ब) कर्तरी प्रयोग

क) भावे प्रयोग

ड) कर्मणी प्रयोग

२५. मो.के.दामले यांनी नामाचे वर्गीकरण कसे केले आहे?

अ) सामन्यनाम – विशेषनाम

ब) विशेषनाम - भाववाचक नाम

क) धर्मवाचक - धर्मीवाचक नाम

ड) नाम –सर्वनाम

२६. नामाच्या पूर्वी आणि नंतर लागणाऱ्या विशेषणांना कोणत्या प्रकारची विशेषणे म्हणतात ?

अ)सार्वनामिक

ब)संख्यावाचक

क) गुणवाचक

ड)अधि – विधी

२७. "रामाने वानरांकडून सेतू बांधविला" या वाक्यातील क्रियापद कोणत्या प्रकारचे आहे ?

अ) प्रयोजक

ब)शक्य

क) संयुक्त

ड) अकर्मक

२८.तृतिया या विभक्तीचे कार्य काय आहे?

अ) कर्ता दाखवणे

ब) साधन दाखवणे

क) कर्म दाखवणे

ड) संप्रदान

२९. आख्यात प्रत्यय काय दर्शवतो?

अ) प्रकार- प्रयोग

ब) अर्थ- प्रयोग

क)काळ-अर्थ

ड)संदर्भ-निर्देश

३०. मराठीतील दीर्घ ईकारान्त तत्सम नामे सामान्यतः कोणत्या लिंगाची असतात?

अ) पुलिंगी

ब)नपुसकलिंगी

क)स्त्रीलिंगी

ड)उभयलिंगी

३१.खाली दिलेल्या शब्दांपैकी अव्ययीभाव समास असलेला शब्द ओळखा.

अ) प्रतिदिन

ब)महादेव

क)पंचवटी

ड) समास

३२.कर्तरी प्रयोगात कर्ता कोणत्या विभक्तीत असतो ?

अ) द्वितीयेत

ब) चतुर्थीत

क) प्रथमेत

ड)तृतीयेत

३३. कर्तरी प्रयोगात कर्म नेहमी कोणत्या विभक्तीत असते ?

अ) प्रथमेत

ब) द्वितीयेत

क) तृतीयेत

ड) चतुर्थीत

३४."त्याच्या घराचे दार उघडले" आणि "त्याने घराचे दार उघडले" या दोन वाक्यांतील उघडले हे क्रियापद कोणत्या प्रकारचे आहे ?

अ) सकर्तृक

ब) सकर्मक

क) अकर्तृक

ड)उभयविध

३५.वाक्यात वापरल्या जाणाऱ्या शब्दाला काय म्हणतात ?

अ) सर्वनाम

ब) पद

क)नाम

ड) विशेषण

३६.इष्टलिंगी वसलिंगी सर्वनाम हे वर्गीकरण कोणत्या व्याकरणाकाराने केले आहे ?

अ) मो.के. दामले

ब) अरविंद मंगरूळकर

क) दादोबा पांडुरंग

ड) कृष्ण अर्जुनवाडकर

३७.अरविंद मंगरूळकरांनी केलेले विशेषणांचे वर्गीकरण काय दर्शवते ?

अ) विशेषणांतील भेद

ब) विशेषणांचे विकारी व अविकारीपण

क) विशेषणांचे संख्यावाचकत्व

ड) विशेषणांचे गुणवाचकत्व

३८.स्वतः, आपण ही सर्वनामे कोणत्याप्रकारची आहेत ?

अ) सलिंगी

ब) इष्टलिंगी

क) आत्मवाचक

ड)पुरूषवाचक

३९."आपण आलात आणि सभेची शोभा वाढली" या वाक्यातील 'आपण' हे सर्वनाम कोणत्या प्रकारचे आहे ?

अ) आत्मवाचक

ब) अनेकवचनी

क) आदरार्थी

ड) प्रथम पुरूषी

४०."हा करोना विषाणू जगातून केव्हा नष्ट होईल आणि जगणे पूर्ववत कधी होईल कोण जाणे."या वाक्यातील कोण हे सर्वनाम कोणत्या प्रकारचे आहे ?

अ) प्रश्नार्थक

ब) संबंधी

क) अनिश्तितता दर्शक

ड) दर्शक

४१. "करोना विषाणूची लस कोण तयार करत आहे ?"या वाक्यातील कोण हे सर्वनाम कोणत्या प्रकारचे आहे ?

अ)अनिश्चिततदर्शक

ब) दर्शक

क) पुरूषवाचक

ड) प्रश्नार्थक

४२.'तो हुशार मुलगा आहे' आणि 'तो मुलगा हुशार आहे' या वाक्यातील विशेषण कोणत्या प्रकारचे आहे?

अ) गुणवाचक

ब) सार्वनामिक

क) अधि-विधी

ड) संबंधी

४३.देवा , तूच आता या करोना संकटातून जगाला सोडव ! या वाक्यातील देवा या शब्दाची विभक्ती कोणती आहे ?

अ) केवलप्रयोगी

ब) उदगारवाचक

क) संबोधन

ड) प्रथमा

४४."जो गर्जेल तो पडेल काय "या वाक्यातील सर्वनामे कोणत्या प्रकारची आहेत ?

अ)दर्शक

ब) प्रश्नार्थक

क) अनिश्चिततदर्शक

ड) संबंधी

४५."श्रीनिवास पत्र लिही" या वाक्यातील क्रियापदाला लागलेला आख्यात प्रत्यय कोणता आहे ?

अ) उख्यात

ब) वाख्यात

क) ईलाख्यात

ड)ताख्यात

४६.संयुक्त क्रियापदाच्या संदर्भात चर्चा करणारे व्याकरणकारांचे दोन गट कोणते ?

अ) वादी – संवादी

ब) जहाल –मवाळ

क) भाववादी- अभाववादी

ड) आहेरे- नाहीरे

४७.देवाचिये द्वारी उभा क्षणभरी या वाक्यातील चिये सारख्या प्रत्ययांतून षष्ठीच्या प्रत्ययांची व्युत्पत्ती झाली आहे हे मत कोणी मांडले आहे ?

अ) अरविंद मंगरूळकर

ब) मो.के.दामले

क) वि.का.राजवाडे

ड) भंडारकर

४८.बेनझीर, बेजबाबदार या शब्दांतील बे हा उपसर्ग कोणत्या भाषेतून मराठीत आला आहे ?

अ) हिंदी

ब)इंग्रजी

क) फारसी

ड)डच

४९.बटाटा, पाव यासारखे शब्द मराठीत कोणत्या भाषेतून आले आहेत ?

अ) इंग्रजी

ब) हिंदी

क) डच

ड) पोर्तुगीज

५०.आसेतूहिमाचल , आजानुबाहू हे कोणत्या प्रकारचे सामासिक शब्द आहेत ?

अ) उपसर्गघटीत

ब) शब्दयोगी

क) अव्ययीभाव

ड)कर्मधारय

-----------------------------------------------------------------------------------------------------------------